महसूल विभागाच्या योजनांच्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Government Process-Re-Engineering (GPR)) ला मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५२/ई-१८१७६१४/अर्थसंकल्प

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- २० नोव्हेंबर, २०२६

वाचा -

१. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१७२५/प्र.क्र.१२६/मातं, दि.३०.०५.२०२५.

२. मा. मुख्य सचिव या अध्यक्षतेखालील शासकीय पुर्नरचना प्रक्रीया समितीच्या दि.०४.११.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील शासन परिपत्रकान्वये शासकीय सेवा अधिक पारदर्शक, सुलभ, कालबध्द, नागरिकाभिमुख व पूर्णतः डिजीटल करण्यासाठी शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Government Process-Re-Engineer (GPR)) राबविण्याबाबत सर्व विभागांना निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या शासकीय पुनर्रचना प्रक्रीया समितीच्या दि.४.११.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये महसूल विभागाच्या सेवा व योजनांच्या एकत्रित GPR ला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महसूल विभागाच्या योजनांच्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Government Process-Re-Engineer (GPR) ला मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्य शासनाच्या शासकीय प्रक्रिया पुर्नरचना Government Process Re-engineering (GPR) मोहीमेअंतर्गत महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत शासकीय पुनर्रचना प्रक्रीया समितीच्या दि.४.११.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये विभागाच्या योजनांच्या GPR ला दिलेल्या मान्यतेनुसार महसूल विभागातील योजनांचे खालीलप्रमाणे सुसूत्रीकरण व सुलभीकरण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र	योजनेचे नाव	नियोजन विभागाच्या सूचना	विभागाने करावयाची कार्यवाही	कार्यवाहीची कालमर्यादा
१	२	३	४	५
१	सर्वसाधारण मुद्दा	सन २०२० पूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या योजनांच्या शासन निर्णयांचा आढावा घेऊन, ज्या योजना कालबाहय	• महसूल विभागामार्फत केंद्र शासन पुरस्कृत योजना आणि "गतिमान प्रशासन तथा आपात्कालीन व्यवस्थेचे	--

		असतील, तसेच लाभार्थी नगण्य असतील अशा योजना सक्षम स्तरावर निर्णय घेऊन बंद करण्याची कार्यवाही करावी. तसेच उर्वरीत योजनांचा आढावा घेऊन सदर योजना अद्ययावत करण्याची कार्यवाही करावी.	बळकटीकरण" जिल्हा वार्षिक योजना राबविण्यात येत आहेत. याबाबतचे अभिप्राय पुढे देण्यात येत आहेत. • विभागाकडे वैयक्तिक लाभार्थी असलेली कोणतीही योजना राबविण्यात येत नाही.	
२	सर्वसाधारण योजना	एकसारख्या विविध योजनांचे एकत्रीकरण करून सर्वसमावेशक एकछत्री योजना तयार करावी. उदा - बांधकाम.	• महसूल विभागा अंतर्गत नोंदणी व मुद्रांक, महसूल तसेच भूमि अभिलेख हे स्वतंत्र उपविभाग असल्याने सदर बांधकामाची लेखाशिर्षे वेगवगळी / स्वतंत्र ठेवणे प्रशासकीय नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने सुलभ ठरणार आहे. यास्तव सदरहू बांधकामाच्या योजना महसूल विभागामार्फत पूर्वीप्रमाणेच स्वतंत्रपणे राबविण्यात येणार आहेत.	--
३	गतिमान प्रशासन तथा आपात्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण	"**गतिमान प्रशासन तथा आपात्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण**" योजना जिल्हा वार्षिक योजने ऐवजी राज्यस्तरावर घेण्याचा आढावा घ्यावा.	• महसूल विभागाची जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सुरु असलेली एकमेव योजना. • शासन निर्णय दि. २७.०६.२०२२ अन्वये सुरु करण्यात आली आहे. • जिल्हा नियोजन समितीच्या एकूण नियतव्ययाच्या कमाल ५% पर्यंत निधी जिल्ह्याच्या गरजेनुसार उपलब्ध होऊ शकतो. • **योजनेंतर्गत अनुज्ञेय बाबी** :- स्थानिक पातळीवर विभागासाठी मुलभूत व पायाभूत सुविधा निर्माण करणे, कार्यालय / निवासी इमारत बांधकाम, शासकीय इमारतींची दुरुस्ती, फर्निचर खरेदी, वाहन अनुज्ञेय असलेल्या अधिका-यांसाठी वाहन खरेदी तसेच गतिमान प्रशासनाच्या दृष्टीने तसेच	Assets Management System (२८.०२.२०२७)

			आपात्कालिन परिस्थिती हाताळण्यासाठी अत्याधुनिक उपकरणे / यंत्रसामुग्री खरेदी. • **योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणा-या सर्व उपकरणांची नोंद Assets Management System वर घेण्यात येईल.** • योजना राज्यस्तरावर घेतल्यास प्रत्येक जिल्ह्याकडून त्यांच्या गरजांनुसार प्रस्ताव घेऊन निधी उपलब्ध करुन देण्यामध्ये विलंब होण्याची शक्यता. तसेच महसूल विभागाच्या अपुऱ्या नियतव्ययातून आवश्यक निधी उपलब्ध करणे कठीण ठरेल.	
४	**मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद योजना**	मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद योजनेतील सर्व कामांचे PM Gati Shakti प्रणालीवर मॅपिंग करावे. कामांची MH-UID संकेतस्थळावर नोंद करून इतर विभागांतील कामांची द्विरुक्ती टाळावी.	• सदर सूचना महसूल विभागाने स्विकारली आहे. त्याची अंमलबजावणी विभागाच्या स्तरावर सुरु आहे. • मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र वेब पोर्टल सुरू करण्यात आले आहे. • नियोजन विभागाच्या शासन निर्णय दि. १९.११.२०२५ व २५.०८.२०२५ मधील सूचनांनुसार मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेतील रस्ते PM Gati Shakti वर मॅपींग करणे व MH-UID निर्मिती करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. • जमाबंदी आयुक्त कार्यालयाची MRSAC सोबत चर्चा करण्यात आली असून, मॅपिंग व MH-UID	--

			निर्मितीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.	
५	इमारत बांधकामांसाठी Type Plan	महसूल विभागाच्या इमारत बांधकामांसाठी Type Plan मध्ये खालील मुद्यांबाबत कार्यवाही करावी. • इमारत सभोवताली वृक्षारोपणाचा समावेश करावा. • वीज बील कमी होण्यासाठी इमारतींवर सौर उर्जा प्रकल्पाचा विचार करावा. • इमारतींमधील फर्निचर /Interior च्या कामासाठीच्या खर्चास कमाल मर्यादा (Capping) लावणे. • महसूल विभागाच्या विविध योजना तसेच प्रकल्पांबाबत करण्यात येणा-या जाहिराती करिता Digital Board चा अधिकाधिक वापर करण्याबाबत विचार व्हावा जेणेकरुन दीर्घ कालावधीसाठी शासनाचा आवर्ती खर्च कमी होऊ शकेल. • सदर सर्व योजनांचे PM Gati Shakti प्रणालीवर मॅपिंग करण्यात यावे.	• सदर सूचना महसूल विभागाने स्विकारली आहे. त्याची अंमलबजावणी विभागाच्या स्तरावर सुरु आहे. • मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालयांचे Type Plan अंतिम झाले आहेत. • महसूल विभागाच्या अधिनस्त महसूल / भूमि अभिलेख / नोंदणी व मुद्रांक कार्यालयांकरीता Type Plan करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. • सदर Type Plan मध्ये मा. मुख्य सचिव यांच्या बैठकीमध्ये सूचित करण्यात आलेल्या मुदयांचा समावेश करण्याबाबतही कळविण्यात आले आहे. सदरहू कार्यवाही डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.	दिनांक ३१.१२.२०२६
६	७/१२ जमिनीच्या नोंदी.	विहिरी, शेततळे, प्रधानमंत्री आवास योजनेतील घरे, City Survey क्रमांक, Property Card क्रमांक आणि Command Area यांची नोंद जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर करावी.	• विहिरी, शेततळे व इतर जल स्त्रोतांबाबतची माहिती ही गाव नमुना नंबर ७/१२ वर न घेता गाव नमुना नंबर १४ वर घेण्याबाबतची तरतूद महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ च्या खंड ४ मध्ये आहे. • PMAY मधील गावठाणातील घरे यांची नोंद स्वामित्व अंतर्गत मिळकत पत्रीकेवर घेण्यात येते. • गावठाणा बाहेरील घरांची नोंद ७/१२ वर घेण्यात येते.	--

			• Command Area मधील जमिनीच्या नोंदी ७/१२ घेण्याकरीता संबंधीत यंत्रणांनी सदर जमिनी भूसंपादित केल्याबाबतचे अभिलेख महसूल विभागाकडे सादर केल्यास त्याबाबतची नोंद ७/१२ उताऱ्यावर घेण्यात येतील.	
७	API-आधारित प्रणालीद्वारे दुबार लाभास प्रतिबंध	भूमापन कार्यालयाने जमीन मोजणी करून दिल्यानंतर त्याचे Returned API भूमी अभिलेख कार्यालयास प्राप्त होत नाहीत. त्यामुळे जमीन मोजणी नोंदीच्या आधारे संबंधित व्यक्तीने शासनाकडून कोणकोणते लाभ मिळवले आहेत, याची माहिती भूमी अभिलेख कार्यालयाकडे उपलब्ध नसते. Returned API उपलब्ध करून लाभांची पडताळणी व द्विरुक्ती प्रतिबंधित करण्याचा प्रस्ताव मुख्य सचिवांना सादर करावा.	प्रस्तावित संकल्पनाः एक भूखंड, एक Parcel ID: ७/१२, ८-अ, मालमत्ता पत्रक व भू-नकाशे यांची भूखंडनिहाय सांगड घालणे. • एक भूखंड, एक Parcel ID: ७/१२, ८-अ, मिळकत पत्रिका व भू-नकाशांना स्वतंत्र Parcel ID शी जोडणे. • अभिलेखीय व भौगोलिक एकत्रीकरणः भूखंडाची अभिलेखीय माहिती व नकाशावरील सीमा एकत्रित करणे. • शासकीय योजना व मालमत्ता जोडणी: विहिरी, शेततळी, PMAY घरे व सिंचन क्षेत्र इत्यादींची Parcel ID शी सांगड घालणे. • GIS लाभार्थी डेटाबेसः वैयक्तिक लाभार्थी योजनांची योजनानिहाय व लाभार्थी निहाय GIS माहिती तयार करणे. • विकासकामांच्या नोंदी: शासकीय योजनांतील भौतिक विकासकामांची GIS नोंद व अद्ययावतीकरण करणे. • API द्वारे माहितीची देवाणघेवाणः अधिकृत विभागांना भूखंड व शासकीय लाभ पडताळणीसाठी API सुविधा देणे. • माहितीचे अद्ययावतीकरणः सर्वेक्षणातून प्राप्त माहिती API	दिनांक २८.०२.२०२७

			द्वारे घेऊन अभिलेख व नकाशे अद्ययावत करणे. • दुबार लाभांना प्रतिबंध: भूखंड किंवा लाभार्थीनिहाय संभाव्य दुबार शासकीय लाभ ओळखणे. • टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीः निवडक जिल्ह्यांत पथदर्शी प्रकल्प राबवून यशस्वीतेनंतर राज्यभर विस्तार करणे.	
८	बंद करण्यासाठी प्रस्तावित योजना	राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम - १००% केंद्र हिस्सा (२०२९०८०५). भूमापन व जमाबंदीची कामे - ५०% केंद्र हिस्सा (२०२९०७६१ /२०२९०७९९). भूमी अभिलेख संगणकी-करणावरील खर्च - १००% केंद्र अनुदान (२०२९०७२५).	• लेखाशिर्ष २०२९०८०५ खाली केंद्र शासनामार्फत राबविण्यात आलेल्या DILRMP २.० अंतर्गत निधी प्राप्त होतो. या कार्याक्रमाची मुदत दि.३०.०९.२०२६ रोजी समाप्त करण्यात आलेली आहे. आता DILRMP ३.० हा कार्यक्रम सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी मंजूर करण्यात आला असून, DILRMP २.० मधील बहुतांश उपक्रम DILRMP ३.० मध्ये ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे लेखाशिर्ष २०२९०८०५ बंद करता येणार नाही. • सध्या केंद्र शासनाकडून ५०% केंद्र हिस्सा योजना बंद करण्यात आलेली असल्याने लेखाशिर्ष २०२९०७६१ व २०२९०७९९ बंद करण्याची शिफारस करण्यात येत आहे. • तसेच लेखाशिर्ष २०२९०७२५ हे १००% केंद्र अनुदानासाठी असलेल्या लेखाशिर्षाखाली केंद्र शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नसल्याने तेही बंद करण्याची शिफारस करण्यात येत आहे.	--

वरील तत्क्यात दिल्यानुसार स्तंभ ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे योजना बंद करणे, योजना सुधारीत करणे, याबाबत स्वतंत्रपणे शासन निर्णय निर्गमित करण्यात यावेत. या विभागातील योजनांशी संबंधित कार्यासनांनी वरीलप्रमाणे योजनानिहाय कार्यवाही विहित कालमर्यादेत पूर्ण करावी. तसेच वरीलप्रमाणे योजनानिहाय होणारे बदल हे नियोजन विभाग, वित्त विभाग, मा. महालेखापाल यांच्या मान्यतेनुसार करण्यात यावेत.

२. सदरचा शासन निर्णय हा योजनांचे सुसूत्रीकरण, अधिक सुलभ व कार्यक्षम करण्याच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे. या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या योजनांबाबत इतर तरतूदी ह्या सदर योजनांच्या मूळ शासन निर्णयाप्रमाणेच राहतील.

३. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या दि.०३.०८.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीच्या दि.४.११.२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६११२०१८३७२८८८४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=F0B627B3230194FA84BD0E5B4EB590E81C2C15CE998BA19F4825B4AC3EEE13CE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1E31BE6F920A3D606925AB728A537257F35F1F0BE19B929C1B0DDCBA1E89366B, cn=ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2026.11.20 18:38:26 +05'30'

(अश्विनी यमगर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव , राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा सभापती/उपसभापती विधानपरिषद, यांचे सचिव,
३) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. उपमुख्यमंत्री, (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. विरोधी पक्षनेते, विधान सभा/विधान परिषद, मुंबई
७) मा. मंत्री महसूल विभाग, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
८) मा. राज्यमंत्री महसूल विभाग यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
९) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
१०) सर्व विधानसभा/विधानसभा सदस्य.
११) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) मुख्य आयुक्त, राज्य लोकसेवा आयोग, मुंबई
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४) अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२.
१५) अपर मुख्य सचिव (महसूल) विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६) प्रधान सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२.
१७) विभागीय आयुक्त (सर्व), महसूल विभाग, महाराष्ट्र राज्य.
१८) आयुक्त, जमाबंदी व भूमि अभिलेख कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१९) मुद्रांक महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
२१) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
२२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२३) अधिदान व लेखा अधिकारी (अराप/रालेवि-१), मुंबई.
२४) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२५) सह सचिव, (अर्थसंकल्प/व्यय-९ व १०), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२६) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७) अवर सचिव / कक्ष अधिकारी (आस्था-८,पाणंद रस्ते,भूमापन व मुद्रांक), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२८) निवड नस्ती (अर्थसंकल्प), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.